# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम- २०१२

## भाषेतर विषय : भाग - २

## इयत्ता ६ वी ते ८ वी

-: विषय :-

गणित • सामान्य विज्ञान • इतिहास, ना. शास्त्र • भूगोल
कार्यानुभव • कलाशिक्षण • शारीरिक शिक्षण

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे - ३०
(विद्या परिषद)

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२
# भाषेतर विषय : भाग - २
## इयत्ता ६ वी ते ८ वी


- **प्रवर्तक**
  शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र राज्य
- **प्रेरणा व मार्गदर्शन**
  मा. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **निर्मिती व प्रकाशन**
  महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे.
- **संपादक व प्रकाशक**
  नामदेवराव जरग, संचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे.
- **कार्यकारी संपादक**
  डॉ. शकुंतला काळे, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे.
  दिनकर पाटील, सहसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे
- **समन्वयक**
  ल. ल. शिंदे, उपसंचालक, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे.
  गोविंद खुरंगे, विभागप्रमुख, अभ्यासक्रम विकसन विभाग,
  महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, (विद्या परिषद) पुणे.
  - डॉ. सुनिता जगदाळे, विषयतज्ज्ञ, अभ्यासक्रम विकसन विभाग
  - राजश्री वैद्य, समन्वयक, अभ्यासक्रम विकसन विभाग
- **प्रती –** १००, एप्रिल २०१३
- **मुद्रक –** रुना ग्राफिक्स,
  स. नं. ६४, हिस्सा १-२/१ वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड, पुणे ४१.


- © सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन


- अर्थसहाय्य महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई


***

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम - २०१२

## भाषेतर विषय : भाग - २

### इयत्ता ६ वी ते ८ वी

## अनुक्रमणिका


| अ. क्र. | विषय | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | गणित | १ |
| २. | सामान्य विज्ञान | ७३ |
| ३. | इतिहास, नागरिकशास्त्र | १७७ |
| ४. | भूगोल | २२३ |
| ५. | कार्यानुभव | २६५ |
| ६. | कलाशिक्षण | ३५५ |
| ७. | शारीरिक शिक्षण | ४०१ |
| ८. | परिशिष्टे | ४३५ |

१) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ नुसार प्राथमिक शिक्षण (इ. १ली ते ८वी) अभ्यासक्रम पुनर्रचनेसाठी राज्यस्तरीय समिती व विषयनिहाय अभ्यासमंडळे गठित करून अंमलबजावणी करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक पीआरई १४११/(१७५/११) प्राशि–५, दिनांक २७ जुलै २०१२

२) राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ व महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० नुसार इ. १ली ते ८वी च्या पुनर्रचित अभ्यासक्रमानुसार सुधारित विषयरचनेस मान्यता देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक पीआरई १२१२/(६/१२)/प्राशि–५ दिनांक २० जून २०१२

३) सन २०१०–११ या शैक्षणिक वर्षापासून इ. १ली ते ८वी साठी (प्राथमिक स्तर) सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन कार्यपद्धती लागू करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक पीआरई २०१०/(१३६/१०)/प्राशि–५ दि. २० ऑगस्ट २०१०

४) शैक्षणिक वर्षामधील कामाचे किमान दिवस, शिक्षणाचे तास व शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला किमान तास निश्चित करणेबाबत शासन निर्णय क्रमांक पीआरई/१०१०/प्र.क्र.११४/प्राशि–१ दिनांक २९ एप्रिल २०११.

५) शालेय इंग्रजीसह अन्य अमराठी माध्यमाच्या शाळांमधून मराठी (भाषा) विषय अध्यापन अनिवार्य करणेबाबत शासन निर्णय क्रमांक सुप्राअ २००६/(१६४/०६)/ प्राशि– ५ दिनांक ४ फेब्रुवारी, २००९.

६) प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ (इ. १ली ते ८वी) च्या मसुद्यास मान्यता देण्याबाबत शासन निर्णय क्रमांक : पीआरई–१४११/(१७५/११)/प्राशि–५ दिनांक २८ डिसेंबर, २०१२

७) विषयनिहाय अभ्यासक्रमाचे समीक्षण करणाऱ्या विशेष तज्ज्ञांची सूची.

# प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम – २०१२
## भाषेतर विषय भाग – २
## इयत्ता ६ वी ते ८ वी
## प्रस्तावना

**पार्श्वभूमी :**

**१. शिक्षणाचे प्रयोजन आणि सार्वत्रिकीकरण :**

शालेय शिक्षणाचा प्रारंभ हा मुलाच्या विकासाच्या मार्गावरचा महत्त्वाचा टप्पा असतो. परिसरातून घडणाऱ्या सहज शिक्षणाला, शाळेमध्ये परिपूर्ण व्यक्तिमत्त्व जडण घडणीसाठी शिक्षणशास्त्रीय, कालमर्यादित, नियोजनाची जोड मिळते. हे नियोजन साध्य करण्यासाठी शाळा, शिक्षक, पर्यवेक्षकीय यंत्रणा असे पाठबळ प्राप्त होते. शिक्षणामुळे व्यक्ती स्वतःचा विकास साधत असताना भोवतालच्या समाजाची संस्कृती आणि परंपरा स्वीकारून समाजात सामावली जाते. समाजाच्या विकासाच्या आकांक्षा पूर्ण करण्यासाठीही शिक्षित व्यक्ती अधिक सक्षम ठरते. व्यक्ती, समाज आणि राष्ट्राचे व्यक्तिमत्त्व सक्षम आणि समृद्ध करण्यास शिक्षण केंद्रिभूत ठरते.

शिक्षणाचे हे विलक्षण सामर्थ्य जाणूनच प्रत्येकाला गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळावे यासाठी समाजसुधारकांनी निरंतर आणि प्रसंगी संघर्षपूर्ण प्रयत्न केले. महाराष्ट्रामध्ये थोर सुधारकांनी निरनिराळ्या पर्यायांचा अवलंब करून मुली, अनुसूचित जाती–जमातीची मुले, या आणि अशा वंचितापर्यंत शिक्षण पोहोचण्यासाठी केलेल्या प्रयत्नांची एक प्रेरणादायी परंपरा निर्माण झाली. अर्थात गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचे ध्येय साध्य करण्यासाठी अजून बरीच वाटचाल बाकी आहे. या वाटचालीची गती अनेक सुजाण व्यक्ती/संस्था, सर्व शिक्षा अभियानसारखे निश्चित दिशा आणि कालमर्यादा असणारे कार्यक्रम कायम राखण्यास मदत करीत आहेत. भारत सरकारने बालकाच्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ या कायद्याची अंमलबजावणी सुरू केली आहे. त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाला एक निश्चित व्याप्ती आणि शक्ती लाभली आहे.

**२. प्राथमिक स्तरावरील अभ्यासक्रमाची वाटचाल :**

शिक्षणातून अपेक्षित व्यक्तिमत्त्वविकास साध्य करण्यासाठी अभ्यासक्रम महत्त्वाची भूमिका बजावतो. कोणत्या वयात काय, किती आणि कसे शिकायचे हे अभ्यासक्रम निश्चित करीत असल्यामुळे अभ्यासक्रम हा शिक्षणाच्या गुणवत्तेचे अविभाज्य अंग आहे. त्यामुळे सुयोग्य आणि परिपक्व अभ्यासक्रमाची निर्मिती ही गुणवत्ता साधण्याच्या वाटेवरचे महत्त्वाचे पाऊल ठरते. समाजाच्या गरजा व आशा आकांक्षा, समाजाचा इतिहास, वैज्ञानिक प्रगती, इतर सामाजिक व राजकीय घडामोडी, शिक्षणशास्त्रामधील प्रगती, राष्ट्रीय व राज्याची धोरणे यांची दखल घेणारा अभ्यासक्रम कालसुसंगत व दर्जेदार होतो. परंतु हे सर्वच घटक गतिमान

असल्याने अभ्यासक्रमालाही गतिमान राहावे लागते. राज्याच्या अभ्यासक्रमात अनेक वेळा परिस्थितीनुसार बदल झाले आहेत. त्यांचा धावता आढावा घेणे उपयुक्त ठरेल.

२.१ **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९६८ :–** डॉ. कोठारी यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या राष्ट्रीय शिक्षण आयोगाने (१९६४–६६) केलेल्या शिफारशींचा विचार करून हे धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणामुळे भारतातील निरनिराळ्या राज्यांचे भाषाविषयक धोरण, शिक्षणाचा आकृतिबंध यामध्ये समानता येण्यास चालना मिळाली. तसेच कार्यानुभव विषयास चालना मिळण्यास मदत झाली.

२.२ **प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९६८ :–** महाराष्ट्र राज्याची स्थापना झाली त्यावेळी नागपूर, पश्चिम महाराष्ट्र व मराठवाडा या तीन विभागांत निरनिराळे अभ्यासक्रम सुरू होते. त्यांचे एकसूत्रीकरण करून व त्यांची उंची वाढवून शास्त्रीय पद्धतीने प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम १९६८ तयार करण्यात आला. या अभ्यासक्रमाच्या १० मूलभूत उद्‌दिष्टांपैकी प्रथम उद्‌दिष्ट 'शिक्षणाविषयी आवड निर्माण होऊन अध्ययनाच्या पायाभूत साधनांवर पुरेसे प्रभुत्व संपादता यावे' असे होते.

२.३ **शिक्षण विषयाचा समवर्ती सूचीमध्ये समावेश :–** शिक्षणामध्ये राष्ट्रीय स्तरावर एकसूत्रता असण्याची गरज होती त्याचबरोबर शिक्षणाचे नियोजन करताना राज्याच्या स्थानिक गरजा आणि परंपरा यांचीही दखल घेणे गरजेचे होते. त्यादृष्टीने राज्याच्या अखत्यारित असणारा हा विषय राज्य व केंद्र या दोन्हीच्या समवर्ती सूचीमध्ये असणे आवश्यक होते. १९७६ मध्ये संविधानात दुरुस्ती करून शिक्षण या विषयाचा समावेश समवर्ती सूचीमध्ये करण्यात आला.

२.४ **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – १९८६ :–** देशभरात शैक्षणिक विचारमंथन घडवून आणून हे धोरण निश्चित करण्यात आले. या धोरणामध्ये शिक्षणापासून वंचित असणाऱ्या सर्व प्रकारच्या गटांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. 'खडू–फळा मोहिमेद्‌वारे' शाळांच्या मूलभूत भौतिक गरजांची पूर्तता, मुक्त विद्यापीठ, बालक केंद्रित शिक्षण राष्ट्रीय गाभा घटक ही या धोरणाची महत्त्वाची फलिते आहेत. या धोरणातील उद्‌दिष्टांची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी १९९२ मध्ये एक कृतिकार्यक्रमही तयार करण्यात आला.

२.५ **प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९८८ :–** राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला अनुसरून या अभ्यासक्रमाची रचना करण्यात आली. कोणताही आशय शिकविताना त्यातून विद्यार्थ्यांच्या वर्तनात नेमके कोणते बदल अपेक्षित आहेत हे स्पष्ट करणाऱ्या 'अध्ययन निष्पत्ती' हे या अभ्यासक्रमाचे वैशिष्ट्य होते. त्याचप्रमाणे मूल्यमापनाविषयीच्या नेमक्या सूचनांचा त्यात समावेश होता.

२.६ **क्षमताधिष्ठित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, १९९५ :–** डॉ. आर. एच. दवे यांच्या अध्यक्षतेखालील समितीने १९९० मध्ये इ. पहिली ते पाचवी या स्तरासाठी मातृभाषा, गणित व परिसर अभ्यास या विषयांसाठी श्रेणिबद्‌ध मांडणी असणाऱ्या किमान अध्ययन क्षमता निश्चित केल्या. त्यामध्ये राज्याच्या दृष्टिकोनातून योग्य ते बदल करून भाषा, गणित (इ. १ ली ते ५ वी) तसेच विज्ञान (इ. ३ री ते ५ वी) या विषयांच्या क्षमतांचा समावेश असणारा क्षमताधिष्ठित अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

२.७ **इंग्रजी विषय अभ्यासक्रम : –** (इयत्ता पहिली ते चौथी) जागतिकीकरणाचे युग सुरू झाल्यावर विज्ञान–तंत्रज्ञानाची भाषा म्हणून तसेच आंतरराष्ट्रीय संपर्क भाषा म्हणून इंग्रजी भाषेचे महत्त्व वाढू लागले. समाजामध्येही या भाषेचे आकर्षण वाढू लागले. परंतु इंग्रजी भाषेची अपुरी तयारी व व्यवहारात इंग्रजीचा वापर करताना आत्मविश्वासाचा अभाव यामुळे राज्यातील मुले मागे पडत असल्याचे दिसून आले. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाने प्राथमिक स्तरावरील इंग्रजी माध्यमाशिवाय अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये जून २००० पासून इयत्ता पहिलीपासून इंग्रजी हा एक विषय म्हणून सुरू करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयानुसार इंग्रजीचा अभ्यासक्रम तयार करण्यात आला.

२.८ **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००० : –** या आराखड्यामध्ये काही महत्त्वाचे शैक्षणिक मुद्दे पुढीलप्रमाणे आहेत

- प्रयोग आणि काळाच्या कसोटीवर उतरलेल्या अनुभवांच्या आधारे अभ्यासक्रम आणि अध्ययन–साहित्य बालकेंद्रित करणे.
- परीक्षा पद्धतीत सुधारणा करणे, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाच्या कार्यपद्धतीचा अवलंब करणे, मूल्यमापन पद्धतीमध्ये अशा प्रकारे केलेल्या बदलांद्वारे अध्ययन–अध्यापन पद्धतीमध्ये बदल घडवून आणणे.

२.९ **प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २००४ :–** हा अभ्यासक्रम राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २०००च्या आधारे तयार करण्यात आला.

२.१० **राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा, २००५ :–** प्रा. यशपाल समितीच्या **ओझ्याविना अध्ययन** (Learning without Burden) या अहवालातील शिफारशींच्या संदर्भात राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० चे पुनर्विलोकन करण्यासाठी प्रा. यशपाल यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा एक राष्ट्रीय सुकाणू समिती नियुक्त करण्यात आली. तसेच शालेयविषय, शिक्षण प्रक्रिया, जाणिवा यांच्या सद्यस्थितीचा वेध आणि पुढील कार्यवाहीविषयी चिंतनासाठी २१ झोत गटांची (focus groups) स्थापना करण्यात आली. निरनिराळ्या राज्यातील एससीईआरटी/समकक्ष संस्था, शैक्षणिक संस्था व स्वयंसेवी संस्था तसेच शिक्षणतज्ज्ञ यांच्याशी या गटांमार्फत सल्लामसलत करण्यात आली. यातून राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ची (एनसीएफ २००५) निर्मिती झाली. या आराखड्याच्या आधारे प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ ची पुनर्रचना करण्यात आली.

२.११ **महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० :–**

प्राथमिक आणि माध्यमिक स्तरांवरील अभ्यासक्रम आतापर्यंत भिन्नवेळी तयार झाल्यामुळे त्यातील दृष्टिकोन, आशय, उद्दिष्टे यात सलगता, एकसूत्रता राखताना अडचणी जाणवल्या. परंतु यावेळी प्रथमच संबंधित संस्थांनी एकत्रितपणे इ. पहिली ते बारावीपर्यंतचा आराखडा **महाराष्ट्र राज्य अभ्यासक्रम आराखडा, २०१०** विकसित केला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे; महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई; महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे व महाराष्ट्र

राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे या संस्थांनी परस्परांशी समन्वय साधून या आराखड्याची निर्मिती केली.

हा आराखडा तयार करताना NCF-2005 चा आधार असणाऱ्या २१ शैक्षणिक विषयांवरील सद्यस्थितीदर्शक अहवालांचे (पोझिशन पेपर्स) राज्यातील परिस्थिती संदर्भात अवलोकन करण्यात आले. त्याआधारे राज्यातील शालेय विषय, अध्ययन–अध्यापन पद्धती, मूल्यमापन आणि आनुषंगिक विषयांवर राज्यात कोणती कार्यवाही आवश्यक आहे हे दाखविणारे दस्तावेज तयार करण्यात आले. या सर्व दस्तावेजांचे संकलन एका समन्वय समितीमार्फत करून राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० चा मसुदा तयार करण्यात आला. तो वेबसाईटवर तसेच मुद्रित स्वरूपात प्रकाशित करून त्यावर विभागीय मंडळनिहाय कार्यशाळांतून प्राप्त अभिप्रायाद्वारे हा मसुदा अंतिम करण्यात आला. १२ ऑक्टोबर २०११च्या पत्रान्वये या आराखड्यास शासनाने मान्यता दिली.

### २.१२ विद्याविषयक प्राधिकरणाची नियुक्ती :–

बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मध्ये सूचित केल्यानुसार ७ मार्च २०१२च्या अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे या संस्थेस **विद्याविषयक प्राधिकरण** म्हणून नियुक्त करण्यात आले. या प्राधिकरणाकडे अभ्यासक्रम व मूल्यमापन पद्धती निश्चिती करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ मधील कलम क्र. २९ (२) मध्ये या जबाबदारीचा अधिक तपशील पुढीलप्रमाणे नमूद केला आहे.

१) संविधानात्मक मूल्यांशी सुसंगती राखणे.

२) मुलांचा सर्वांगीण विकास साधणे.

३) मुलांचे ज्ञान, कार्यक्षमता व बुद्धिमत्ता यांचा विकास करणे.

४) मुलांच्या शारीरिक व मानसिक क्षमतांचा परिपूर्ण विकास करणे.

५) मुलांना शोध घेणाऱ्या तसेच इतर उचित कृतींमधून बालकेंद्रित पद्धतीने बालस्नेही वातावरणात मुलांचे अध्ययन घडवून आणणे.

६) मुलाला शक्यतो मातृभाषेतून शिक्षण देणे.

७) मुलांना भीती आणि तीव्र दडपण यांपासून मुक्त ठेवणे. त्यांच्या कल्पना मनमोकळेपणे मांडण्यासाठी मदत करणे.

८) मुलांनी मिळविलेल्या ज्ञानाचे आकलन व त्याचे उपयोजन करण्याची क्षमता यांच्या विकासाचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करणे.

## ३ अभ्यासक्रम पुनर्रचनेची गरज :

३.१ **विविध शैक्षणिक घडामोडी :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण १९८६ तसेच राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००० (NCF-2000) वर आधारित प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ ची अंमलबजावणी सुरू असतानाच केंद्रशासनामार्फत एन.सी.एफ. २००५, प्रचलित अभ्यासक्रमाचे पुनर्विलोकन करण्यासाठी विविध राज्यांना पाठविण्यात आला. विद्यार्थ्यांनी स्वत:च्या अनुभवाच्या आधारे ज्ञाननिर्मिती करावी, निरनिराळ्या पर्यायांचा अवलंब करून आशयाचे ओझे कमी करावे इ. शैक्षणिक तत्त्वांच्या निकषांवर प्रचलित अभ्यासक्रमाची छाननी करून गरजेनुसार त्यात बदल करण्याचे सूचित करण्यात आले. या दृष्टीने पूर्वतयारी सुरू असतानाच राज्यात शिक्षण हक्क कायदा, २००९ लागू करून शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण व गुणवत्तेच्या दृष्टीने आणखी एक ठोस पाऊल उचलले गेले. कायद्यानुसार अपेक्षित सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाची योजना राज्याने देशामध्ये सर्वात आधी लागू केली. त्यातील आकारिक व संकलित मूल्यमापन साधन तंत्रांचा समावेश अभ्यासक्रमात करण्याची आवश्यकता निर्माण झाली. या सर्व दस्तावेजांमधील अपेक्षांची दखल घेण्याच्या दृष्टीने राज्याने प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २००४ ची पुनर्रचना करण्याचा निर्णय घेण्यात आला.

३.२ **जागतिकीकरणाची व इतर आव्हाने :–** आजूबाजूला घडणाऱ्या बदलांची दखल कोणत्याही अभ्यासक्रम रचनेच्या वेळी घ्यावीच लागते. या बदलांमुळे निर्माण होणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी अभ्यासक्रमात यथायोग्य आशयाचा समावेश करावा लागतो. काही आव्हाने नवीन असतात तर काही आव्हाने कठीण असल्यामुळे प्रत्येक वेळी अभ्यासक्रमाची रचना करताना त्यांचा विचार करावा लागतो. त्याचबरोबर येणाऱ्या भविष्यात कोणती नवी आव्हाने उभी ठाकणार आहेत याचाही वेध घ्यावा लागतो. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ ची रचना करताना देखील काही महत्त्वाची आव्हाने डोळ्यांसमोर ठेवली आहेत.

३.२.१ **माहितीचे व्यवस्थापन : –** मुद्रणाच्या शोधापूर्वी माहितीचे संकलन करणे किंवा ती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविणे सोपे नव्हते. एका पिढीने ती पाठ करून किंवा लिहून दुसऱ्या पिढीपर्यंत पोहोचविणे क्रमप्राप्त होते. मुद्रणाच्या शोधानंतर, माहितीचे एकत्रीकरण करणे सोपे झाले. संगणक आणि इंटरनेट यामुळे तर माहितीचा महासागर तयार झाला. या परिस्थितीत माहितीचा प्रचंड साठा आणि भडिमार यांच्याशी जुळवून घेणे हे फार मोठे आव्हान आहे. ही माहिती कुठेही, कधीही क्षणात हजर करणारी आयपॉड, इंटरनेटसह मोबाईल सारखी उपकरणे सामान्य माणसाच्या हातात आली. अनेक मुलेही ती सहजपणे वापरू लागली. या स्थितीत आपल्याला हवी ती माहिती नेमकेपणाने कोठे मिळेल हे ठरवण्याचे व त्यातील दर्जेदार अधिकृत माहिती कोणती याचा निर्णय करण्याचे कौशल्य आत्मसात करणे आवश्यक ठरले आहे. तसेच शाळेत किंवा नंतरही केवळ माहितीचा मोठा संग्रह म्हणजे ज्ञान नाही तर या माहितीचे आकलन होऊन ती नवीन परिस्थितीत वापरता यायला हवी हे उमगणे गरजेचे आहे.

**३.२.२ आजन्म शिक्षण : –** शाळा/महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर शिकणे संपले असे मानून चालणार नाही. ज्ञानाचा विस्तार आणि बदलण्याचा वेग पाहता शेवटपर्यंत शिकतच राहिले पाहिजे. यासाठी 'आपले आपण कसे शिकायचे' हे तंत्र अवगत व्हायला हवे. या तंत्राची ओळख आणि सराव शाळेतच व्हायला हवा. स्वत:हून शिकण्याचे निरनिराळे मार्ग माहीत होऊन ते आपण वापरू शकतो हा आत्मविश्वास निर्माण व्हायला हवा.

**३.२.३. निरनिराळ्या स्रोतांचे सामोपचाराने वाटप :–** वाढत्या लोकसंख्येमुळे अन्न, पाणी साठे, भूमी, वीज इत्यादीच्या पुरवठ्यावर ताण निर्माण होत आहे. हे स्रोत काटकसरीने व तारतम्याने वापरण्याची सवय लागायला हवी. सहिष्णुता व न्यायबुद्धी वापरून त्यांचे सामोपचाराने वाटप होण्याविषयीची जाणीव विकसित करण्याची गरज आहे.

**३.२.४. आरोग्य व मानव जातीचे हितसंबंध राखून तंत्रज्ञानाचा वापर :–** लहानपणापासून मुलांचा मोबाईल, टी.व्ही., संगणक यांच्याशी तसेच तंत्रज्ञानाच्या इतर आश्चर्यकारक क्षमतांशी परिचय होतो आहे ही चांगली गोष्ट आहे. परंतु त्यामुळे आहारविहाराच्या सवयी बदलून आरोग्यावर लहान वयात दुष्परिणाम होण्याची अनेक उदाहरणे दिसत आहेत. तंत्रज्ञान वापरताना आरोग्याच्या दृष्टीने घ्यायच्या काळजी विषयी मुलांना सातत्याने जागरूक ठेवण्याची गरज आहे. तसेच विज्ञान–तंत्रज्ञान हे दुधारी शस्त्र असल्याने ते तारतम्याने वापरायचा विवेक जागृत राहण्याची गरज आहे. माणूस आणि पर्यावरण यांना विघातक ठरणाऱ्या गोष्टी घडवून आणण्यासाठी होता कामा नये हे नवीन पिढीवर सातत्याने बिंबवणे आवश्यक आहे.

**३.२.५. मूल्यांची रुजवणूक : –** मूल्यांमध्ये संविधानात समाविष्ट मूल्ये व शासनाने/विद्याविषयक प्राधिकरणाने स्वीकारलेलव मूल्ये अपेक्षित आहेत. मूल्यांची रुजवणूक करण्यासाठी अधिक नेटाने प्रयत्न करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. शाळा, पालक, समाज यांनी या संदर्भात एकत्रितपणे आखणी आणि अंमलबजावणी करून मूल्यांवरचा विश्वास दृढ करण्याचे आव्हान पेलायला हवे.

**३.२.६. सार्वत्रिकीकरण आणि समावेशकता : –** विशेष गरजा असणारी मुले, मुली, अनुसूचित जाती जमातीची मुले आणि इतरही काही वंचित समूहांना शिक्षणाच्या आणि विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी अनेक प्रयत्न सुरू आहेत. यातून 'समावेशकतेची'(inclusiveness) संकल्पना साकार होत आहे. शिक्षण हक्क कायद्यामुळे या संकल्पनेला अधिक बळ मिळाले आहे. समावेशकता ही मेहेरबानी नसून हक्क आहे हे स्पष्ट झाले आहे. सर्व मुलांना शाळेत दाखल करण्याचे उद्दिष्ट आपण जवळ–जवळ पूर्ण केले आहे. पण याच्या पुढच्या पायरीवर अशा मुलांमध्ये आपल्याला सामान्य मुलांपेक्षा वेगळी वागणूक नाही, आपल्या अडचणी ओळखून लक्ष दिले जाते ही भावना निर्माण व्हायला हवी. त्यांच्या गुणांना वाव मिळून न्यूनगंड राहता कामा नये. अशा प्रकारे सामान्य मुलांच्या समूहात ही मुले मिसळून जाणे आवश्यक आहे. असे घडण्यासाठी 'सर्व मुले शिकू शकतात' या विषयी पालक, शिक्षक आणि समाज यांचे निरनिराळ्या माध्यमांतून उद्बोधन होऊन यांचा या तत्त्वावरील विश्वास अधिकाधिक दृढ होण्याची गरज आहे.

**३.२.७. ओझ्याविना अध्ययन (Learning without Burden) : –** डॉ. यशपाल समितीने 'ओझ्याविना अध्ययनाचा' प्रश्न इ. स. १९९३ मधील अहवालाच्या रूपाने ऐरणीवर आणला. महाराष्ट्रातील सातत्यपूर्ण

सर्वंकष मूल्यमापन योजनेमध्ये आकारिक व संकलित मूल्यमापनाचा समावेश करण्यात आला. तसेच चाचण्या/प्रश्न यांचे स्वरूप बदलून, वेळापत्रक–वेळ यांची बंधने शिथिल करून, रोजच्या सहभागाला मूल्यमापनात महत्त्वाचे स्थान देऊन श्रेणी पद्धत स्वीकारून मुलांवरचे अवाजवी दडपण कमी केले आहे. ही निश्चितच एक लक्षणीय प्रगती मानावी लागेल.

परंतु 'ओझ्याविषयी'च्या इतरही काही मुद्द्यांबाबत उपाययोजना गरजेची आहे. NCF-2005 मधील तत्त्वांचा अधिक काटेकोरपणे अवलंब करून हे शक्य होऊ शकेल. यामध्ये शाळेतील ज्ञानाचा बाहेरील जगाशी संबंध जोडणे अपेक्षित आहे. शिकण्यासाठी घोकंपट्टी करावी लागते हा ग्रह दूर होऊन निरनिराळे संबोध स्पष्टपणे समजण्यास प्राधान्य द्यावे लागेल. मुलांना दिले जाणारे अनुभव पाठ्यपुस्तकापुरते मर्यादित न राहता सर्वांगीण विकासासाठी आवश्यक अनुभव देण्याची योजना अभ्यासक्रमात करावी लागेल. २००४ मधील अभ्यासक्रमात यादृष्टीने असे प्रयत्न झाले असले तरी पुनर्रचनेच्या निमित्ताने अधिक प्रयत्न करण्याची संधी प्राप्त झाली आहे.

३.२.८ **ज्ञानरचनावाद :–** NCF-2005 मध्ये 'ज्ञानरचनावाद' (Constructivism) ही एक मध्यवर्ती संकल्पना आहे. कोणतीही गोष्ट शिकताना करावा लागणारा विचार शक्यतोवर विद्यार्थ्याने स्वतःच करायचा आहे, शिक्षकांनी कोणताही विचार आयतेपणे पुरवण्याची अपेक्षा नाही हे या मध्ये स्पष्ट केले आहे. विचाराची वाट शिक्षकांच्या खांद्यावर बसून चालायची नाही तर शिक्षकांचे बोटसुद्धा आवश्यक तेथे धरायचे. हे ज्ञानरचनावादाचे मर्म आहे. शिक्षकांनी विद्यार्थ्यांची विचार प्रक्रिया त्यांच्याच अनुभवविश्वाच्या आधारे अखंड ठेवायची आहे. प्रश्न विचारणे, निरीक्षण, कृतीच्या संधी देऊन त्यातून मुलांना स्वतःच किंवा इतर मुलांशी चर्चेतून निष्कर्ष काढण्यास प्रोत्साहन देणे, मुलांच्या अनुभवाची गांभीर्याने दखल घेणे, संदर्भ घेण्याचे कौशल्य विकसित करणे, कोश, इंटरनेट, अनुभवी व्यक्ती अशा माहितीच्या स्रोतांचा परिचय करून देणे या प्रकारे शिक्षकांची भूमिका राहणार आहे अशी मानसिकता आणि कौशल्य सतत विकसित करण्याचे आव्हान पेलायचे आहे.

यांसारखी अनेक आव्हाने डोळ्यांसमोर ठेऊन अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्याचे काम या परिषदेने हाती घेतले. पुनर्रचनेची प्रक्रिया सकस करण्यासाठी विविध प्रकारचे प्रयत्न केले. त्यांचा थोडक्यात मागोवा पुढे घेतला आहे.

## ४. अभ्यासक्रम पुनर्रचना प्रक्रिया :–

अभ्यासक्रमाची रचना करताना संपूर्ण जीवनाचा आवाका लक्षात घेणे आवश्यक ठरते. मानवी जीवनाचे ध्येय गाठण्यासाठी निरनिराळ्या विषयांच्या माध्यमातून कोणकोणते अनुभव घ्यावेत याविषयीचे एक भव्य तसेच सुस्पष्ट चित्र अभ्यासक्रम तयार करणाऱ्या तज्ज्ञांसमोर असणे आवश्यक असते. यासाठी निरनिराळ्या क्षेत्रांतील जाणकार व्यक्तींची निवड करून अभ्यासक्रम निर्मितीसाठी आवश्यक तत्त्वे व त्यांचा निर्मितीमध्ये परिणामकारक वापर करण्यासाठी प्रगल्भ असे धोरण विकसित करण्याची गरज असते. हे आव्हानात्मक काम करण्यासाठी परिषदेने या वेळी अभ्यासक्रम निर्मिती प्रक्रियेत अनेक बदल करून ती परिपूर्ण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले. या प्रयत्नांचा संक्षिप्त मागोवा पुढे घेतला आहे.

४.१. **पायाभूत दस्तावेज :–** राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ (NCF-2005) यातील सामान्य शैक्षणिक तत्त्वे तसेच प्रत्येक विषयामधील महत्त्वाची तत्त्वे यांचे प्रतिबिंब राज्याच्या अभ्यासक्रमात पडण्याच्या दृष्टीने हा आराखडा आधारभूत मानण्यात आला. NCF-2005 मधील धोरण आणि शिफारशींचा राज्याच्या परंपरा व परिस्थितीसंदर्भात विचार करून राज्यासाठी सुयोग्य धोरणाचा विचार होऊन राज्य अभ्यासक्रम आराखडा २०१० (SCF-2010) तयार करून त्याला शासनमान्यता घेतली. तोही पायाभूत दस्तावेज म्हणून वापरण्यात आला. एप्रिल २०१० पासून मुलांचा मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार, अधिनियम २००९ ची अंमलबजावणी राज्यात सुरू झाली. त्यामुळे आरटीई – २००९ मधील शिफारशीही अभ्यासक्रम विकसनासाठी आधारभूत मानण्यात आल्या. प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २००४ ची पुनर्रचना NCF-2005 च्या अनुषंगाने करून प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ विकसित करण्यात आला. तोही आधारभूत दस्तावेज म्हणून गृहीत धरण्यात आला.

**पूरक दस्तावेज :–**

या आधारभूत दस्तावेजांबरोबर इतर अनेक पूरक दस्तावेजांचा परामर्श अभ्यासक्रम विकसन करताना घेण्यात आला. त्यातील काही दस्तावेज पुढील प्रमाणे आहेत.

- एनसीईआरटी मार्फत राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा विकसित करत असतना एकवीस गट नेमून अभ्यासक्रमातील विविध शालेय विषय अध्ययन–अध्यापन प्रक्रिया, मूल्यमापन व इतर घटकांसंदर्भात सद्यस्थिती व पुढील विकसनाची दिशा दर्शविणारे दस्तावेज (पोझिशन पेपर्स)
- इतर राज्यांचे अभ्यासक्रम, एस. एस. सी. बोर्डाचा अभ्यासक्रम
- सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन संबंधित शासननिर्णय
- जीवन कौशल्यांवर आधारित शिक्षक मार्गदर्शिका

या सर्व दस्तावेजांमुळे आपापल्या विषयाचा पाठ्यक्रम तयार करण्याविषयी एक दर्जेदार धोरण तयार होण्यास मदत मिळाली.

४.२. **राष्ट्रीय विद्याविषयक प्राधिकरणामधील अभ्यासक्रम विकसनाचा अभ्यास :–** एनसीईआरटी, नवी दिल्ली ही संस्था राष्ट्रीय विद्याविषयक प्राधिकरण म्हणून घोषित केलेली आहे. या संस्थेमार्फत अभ्यासक्रम विकसन कसे केले जाते हे जाणून घेण्यासाठी एससीईआरटी, पुणे या संस्थेच्या प्रतिनिधींनी एनसीईआरटी मधील निरनिराळ्या विभागांतील अधिकाऱ्यांशी समक्ष चर्चेतून माहिती घेतली. अभ्यासक्रमावर आधारित पाठ्यपुस्तके तयार करण्याची प्रक्रिया कशी होते हेही चर्चेतून जाणून घेतले. यातून अभ्यासक्रम निर्मिती विषयीच्या तात्त्विक आणि व्यावहारिक पैलूंविषयीची दृष्टी विस्तृत होण्यास मदत झाली.

४.३. **अभ्यासक्रम पुनर्रचना समिती व विषय अभ्यास मंडळाची नियुक्ती :–** अभ्यासक्रमाच्या पुनर्रचनेसाठी एससीईआरटी च्या संचालकांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय अभ्यासक्रम समिती आणि विषयनिहाय अभ्यास मंडळे अशी द्विस्तरीय रचना करण्यात आली. पुनर्रचनेसाठी कालबद्ध कार्यक्रम निश्चित करणे,

अभ्यासमंडळाच्या विविध शैक्षणिक शिफारशींवर आवश्यक कार्यवाही करणे व त्यांच्या कामांवर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामांसाठी राज्यस्तरीय समिती नियुक्त करण्यात आली. विषयनिहाय अभ्यासमंडळे निश्चित करणे हे एक व्यापक काम होते. यासाठी महाराष्ट्रातील निरनिराळ्या संस्था, प्रशासकीय कार्यालये यांच्याकडून प्राप्त झालेल्या तज्ज्ञांच्या यादीतून प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन/विद्यापीठीय प्राध्यापक/प्रशिक्षण संस्थामधील प्राध्यापक, शिक्षण क्षेत्रात कार्य करणाऱ्या स्वयंसेवी संस्था, क्षेत्रीय अधिकारी इत्यादी संवर्गातील तज्ज्ञांची माहिती मागविण्यात आली. त्यातून प्रथमच स्वतंत्र निवडसमितीमार्फत प्रत्येक विषयाच्या अभ्यास मंडळामध्ये १५ ते २० तज्ज्ञांची निवड करण्यात आली. त्यामध्ये वैयक्तिक माहिती, विशेष अनुभव व प्रादेशिक समतोल, वेळ देण्याची तयारी इत्यादीं मुद्द्यांचा विचार करण्यात आला. अभ्यासमंडळांतील सदस्यांशी झालेल्या चर्चेतून सर्वानुमते अभ्यास मंडळाच्या अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमाशी समन्वयासाठी एसएससी बोर्डातील प्रतिनिधींना निमंत्रित करण्यात आले. पाठ्यक्रमाचा पाठ्यपुस्तकांशी समन्वय राखण्यासाठी पाठ्यपुस्तक मंडळातील प्रतिनिधींचा समावेश अभ्यासमंडळात करण्यात आला. अभ्यासमंडळातील सदस्यांच्या निवडीसाठी अशा पद्धतीचा वापर प्रथमच करण्यात आला. अभ्यासमंडळे गठित करण्या विषयीचा शासन निर्णय परिशिष्ट क्र. १ येथे जोडला आहे.

४.४. **राष्ट्रीय स्तरावरील विद्याविषयक प्राधिकरण व इतर तज्ज्ञांचे मार्गदर्शन :–** एनसीईआरटी, नवी दिल्ली या संस्थेच्या निरनिराळ्या विभागांतील तज्ज्ञांना परिषदेमध्ये निमंत्रित करण्यात आले. त्यांनी अभ्यासक्रम विकसित करणाऱ्या तज्ज्ञांशी थेट संवाद साधला व आपापल्या विषयाचा पाठ्यक्रम तयार करताना वापरावयाची आधारभूत तत्त्वे, तसेच निर्मिती प्रक्रियेचे स्वरूप स्पष्ट केले. त्याबरोबर अनेक व्यावहारिक सूचनाही केल्या. या सर्व तज्ज्ञांशी चर्चेतून पर्यावरण शिक्षण, स्त्री–पुरुष समानता, मूल्यशिक्षण, शांततेसाठी शिक्षण यांची गुंफण व्यावहारिक व परिणामकारक रीतीने अभ्यासक्रमात कशी करता येईल याविषयीची जाणीव प्रगल्भ होण्यास मदत झाली. साध्या–सोप्या कृतींमधून ज्ञानरचनावाद आणि आनंददायी शिक्षण या दोन्ही गोष्टी कशा साधता येतील याचे विस्तृत प्रात्यक्षिक तज्ज्ञांनी दाखविले.

४.५. **परिषदस्तरावरील मार्गदर्शन :–** राज्यस्तरावरील तज्ज्ञ व परिषदेतील अधिकाऱ्यांनी मूल्यशिक्षण, सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापनाविषयी शासन निर्णयातील अपेक्षा, आरटीई २००९ मधील शैक्षणिक तत्त्वांचा व अध्ययन–अध्यापन–मूल्यमापन यांविषयीच्या अपेक्षांचा अभ्यासक्रम विकसनात कशा प्रकारे समन्वय साधता येईल याविषयी विस्तृत चर्चा घडवून आणली. तसेच अभ्यासमंडळ सदस्यांशी वेळोवेळी चर्चा करून पाठ्यक्रम विकसन प्रक्रियेचा आढावा घेतला.

४.६. **विषय योजना :–** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ मधील कलम क्र.२९ मधील तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी केंद्रशासनाच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या शालेय शिक्षण व साक्षरता विभागाकडून शैक्षणिक प्राधिकरणांना मार्गदर्शन प्राप्त झाले. त्यामध्ये विषयांचा समतोल राखण्याबाबत तसेच, अनेक विषयांचा अकारण होणारा बोजा कमी करण्याबाबत सूचित करण्यात आले. या

सूचना व राज्याच्या गरजा यांचा विचार करून इयत्ता १ ली ते ८ वी साठी विषय योजना तयार करण्यात आलेली आहे. विषय अभ्यास मंडळांची रचना ही त्याचप्रमाणे करण्यात आली. विषययोजनेची वैशिष्ट्ये पुढे दिली आहेत.

**विषययोजनेची वैशिष्ट्ये :**

१. प्राथमिक स्तरावरील इ. १ ली व २ री करिता भाषा व गणित हे विषय राहतील व या दोन विषयांमध्येच परिसर अभ्यास हा विषय समाविष्ट असेल.

२. प्राथमिक स्तरावरील इयत्ता ३ री ते ५ वी करिता मराठी, इंग्रजी, गणित, कार्यानुभव, कला शिक्षण, शारीरिक शिक्षण हे विषय यापूर्वीच्या रचनेप्रमाणेच राहतील. तथापि सामान्य विज्ञान, नागरिक शास्त्र व भूगोल या विषयांची एकत्रितरीत्या **परिसर अभ्यास भाग १** मध्ये एकात्म रीतीने मांडणी केली आहे. परिसर अभ्यास भाग १ मध्ये इयत्ता ३ रीचा भूगोल विषयाचा पाठ्यांश हा संबंधित जिल्ह्यांशी निगडित राहील.

३. **परिसर अभ्यास भाग २ मध्ये** इतिहास या विषयाचा समावेश राहील. इयत्ता ४ थी च्या इतिहासात कोणताही बदल असणार नाही.

४. इयत्ता ५ वी च्या वर्गासाठी असणारा हिंदी विषय यापुढेही सुरू राहील.

तपशीलवार विषय योजना परिशिष्ट क्र. २ मध्ये समाविष्ट केलेल्या विषययोजनेसंबंधित शासननिर्णयात समाविष्ट आहे.

**४.७. भविष्यवेधी दृष्टी (vision), ध्येये, उद्दिष्टे यांची निश्चिती** : या सर्व विचारमंथनाच्या आधारे सर्व अभ्यास मंडळाच्या सदस्यांनी सर्वप्रथम प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम, २०१२ पूर्ण केलेला नागरिक कसा असेल यावर चिंतन करून अशा नागरिकाचे एक कल्पनाचित्र तयार केले. (मुद्दा ५.१ भविष्यवेधी दृष्टी) यानंतर प्राथमिक शिक्षणाची ध्येये, शालेय शिक्षणाची साधारण उद्दिष्टे तसेच प्राथमिक शिक्षणाची सर्व साधारण उद्दिष्टे निश्चित केली. ती प्रस्तावनेच्या अखेरीस देण्यात आली आहेत.

**४.८. विषयनिहाय पाठ्यक्रमाच्या आराखड्याची निश्चिती** : विषयनिहाय पाठ्यक्रमाचे आराखडे व त्यांची मांडणी निश्चित करण्यासाठी परिषदेने एनसीईआरटी च्या अभ्यासक्रम मांडणीच्या आराखड्यावर चर्चा घडवून आणली. तसेच प्रत्येक विषय अभ्यासमंडळास विषयाच्या गरजेनुसार आपापल्या विषयाचा आराखडा निश्चित करण्यास स्वातंत्र्य दिले. प्रत्येक विषयगटाने इयत्तानिहाय घटक व उपघटक ठरवून विषयाच्या गरजेनुसार त्यांची मांडणी केली व आपापल्या पाठ्यक्रमाचा आराखडा तयार केला व त्यामध्ये इतर आवश्यक तपशिलाचा समावेश केला.

**४.९. पाठ्यक्रमाच्या मसुद्यांचे अंतर्गत तसेच बाह्यमूल्यमापन** : अभ्यासमंडळातील सदस्यांनी स्वतःच्या विषयाच्या पाठ्यक्रमाचे परिषदेने दिलेल्या पडताळासूचीद्वारे चिकित्सक परीक्षण केले. यानंतर त्या विषयाशी संबंधित नामवंत व त्रयस्थ तज्ज्ञांकडून मूल्यमापन करून घेण्याची प्रक्रिया अभ्यासक्रम विकसनामध्ये प्रथमच वापरण्यात आली. या दोन्ही प्रकारच्या परीक्षणांआधारे पाठ्यक्रम मसुद्यात योग्य ते बदल करण्यात आले.

या प्रकारे अभ्यासक्रम सरस होण्याच्या दृष्टिकोनातून अनेक नव्या प्रक्रियांचा समावेश करून अभ्यासक्रमाची पुनर्रचना करण्यात आली.

## ५. अभ्यासक्रमातील भविष्यवेधी दृष्टी, ध्येये, उद्दिष्टे :

### ५.१ भविष्यवेधी दृष्टी (Vision)

प्राथमिक शिक्षण अभ्यासक्रम २०१२ मधून तयार होणारा नागरिक कसा असेल या विषयीची अभ्यास मंडळांची दृष्टी पुढीलप्रमाणे –

१) भारतीय संविधानाचा सरनामा/प्रस्तावना (Preamble) यामध्ये उल्लेख करण्यात आलेल्या तत्त्वांचा अंगीकार करणारा.

२) सर्वांगीण गुणांची जोपासना करून आपले जीवन आनंदाने जगणारा.

३) आजीवन अध्ययनशील राहून, वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित झालेला.

४) मानवी हक्कांबाबत जागरुक राहून कर्तव्यपालन करण्यास तत्पर असणारा.

५) शांतता व सामंजस्याचा पुरस्कार करणारा.

६) 'वसुधैव कुटुंम्बकम्' या विश्वभावनेवर दृढ निष्ठा असणारा.

### ५.२ प्राथमिक शिक्षणाची ध्येये (Goals)

१) भारतीय राज्य घटनेतील स्वातंत्र्य, समता, समानता, बंधुता, सामाजिक न्याय, धर्मनिरपेक्षता यांसारखी सर्व मूल्ये प्रत्येकाने आपल्या आचरणात आणणे.

२) आपल्या राष्ट्राचा समृद्ध व सर्वसमावेशक सांस्कृतिक आणि सामाजिक वारसा जपण्याची जाणीव विकसित करणे. तो करत असताना नव्या युगातील वास्तव समजून घेण्याची क्षमता आणि कौशल्य निर्माण करणे.

३) जागतिक स्तरावर चिकित्सक समायोजनासाठी देश करीत असलेल्या प्रयत्नांची जाण व संवेदनशीलता निर्माण करणे आणि जागतिक कुटुंबाचा सदस्य म्हणून आपल्या जबाबदाऱ्या आणि उत्तरदायित्व पार पाडण्याची वृत्ती व क्षमता निर्माण करणे.

४) नवनवीन ज्ञानाचा स्वीकार करून त्याचे व्यवस्थापन करण्याची क्षमता विकसित करणे.

५) स्वत:चे व्यक्तिमत्त्व निरंतर विकसनशील आणि सर्जनशील ठेवण्याची क्षमता विकसित करणे.

६) जीवनातील साध्य गाठण्यासाठी साधनांच्या शुद्धतेचे महत्त्व मनावर बिंबवणे.

७) देशातील मानवी व इतर जैविक घटकांबाबत प्रेमभावना आणि त्यांचे संवर्धन तसेच संरक्षण याची जाणीव निर्माण करणे.

८) श्रमप्रतिष्ठा, कार्य–संस्कृती, कलात्मकता यांबाबतची जाणीव निर्माण करणे.

९) व्यावसायिक कौशल्ये विकसित करून समाजोपयोगी उत्पादक कार्यात सहभागी होण्यास प्रवृत्त करणे.

**५.३ शालेय शिक्षणाची साधारण उद्दिष्टे :**

१) भारतीय संविधानात असलेल्या मूल्यांशी अभिसंगत असलेली मार्गदर्शक तत्त्वे समजून घेण्यास तसेच वर्तनात बिंबविण्यास मदत करणे.

२) एकविसाव्या शतकातील विद्यार्थी व भावी नागरिक या भूमिका पार पाडण्यासाठी विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करणे.

३) राष्ट्रीय साधन संपदा, संपत्ती, पर्यावरण यांचे संवर्धन व संरक्षण या संदर्भात निर्माण झालेल्या समस्या आणि त्यावरील उपाय शोधण्याच्या व आपत्ती व्यवस्थापनाच्या प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी आवश्यक ती कौशल्ये विकसित करणे.

४) व्यक्तिगत जीवनात तसेच घर, समाज, शाळा येथे निर्माण होणारे प्रश्न वा समस्या सामंजस्याने सोडविण्याची वृत्ती निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांचे घर, परिसर व समाज यांतील अनुभव आणि शाळेतील सहेतुक अनुभव यांची सांधेजोड करणे.

६) विविध प्रकारच्या अध्ययन अनुभवांतून स्वत:मधील सुप्त गुणांचा शोध घेऊन त्याचा सर्वंकष विकास करण्यासाठी विद्यार्थ्यांना मदत करणे.

७) चिकित्सक विचार करून चांगल्या वाईटातील फरक ओळखण्याची क्षमता विकसित करून चांगल्याचा स्वीकार करण्याची वृत्ती विकसित करणे. चांगले उद्दिष्ट गाठण्याचे मार्गही चांगले असणे आवश्यक आहे, हे विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबवणे.

८) प्रादेशिक, सांस्कृतिक व व्यक्तीपरत्वे विविधता याबाबत आदर बाळगण्यास प्रवृत्त करणे.

९) देशाच्या प्रत्येक चांगल्या आणि अभिमान वाटावा अशा मानवी आणि मानवेतर विशेषांशी जवळीक निर्माण करून विद्यार्थ्यांच्या मनात आपल्या देशाबद्दल अभिमान निर्माण करणे. त्याच बरोबर अन्य देशांच्या अशाच विशेषांबद्दल आदर निर्माण करणे.

१०) ज्ञाननिर्मितीसाठी नागरी साधनांइतकीच स्थानिक साधनेही उपयुक्त आणि महत्त्वाची असतात. अशा दोन्ही प्रकारच्या साधनांचा समन्वय साधून ज्ञान मिळविण्याची सवय विद्यार्थ्यांना लावणे.

११) समाज विकासात स्त्रिया करीत असलेले योगदान व त्याचे महत्त्व याविषयी जाणीव निर्माण करणे.

१२) विद्यार्थ्यांमध्ये सौंदर्याभिरुची, रसास्वाद, कलांचा आस्वाद अशा सृजनात्मक गुणांचा विकास करणे.

१३) विद्यार्थ्यांना शालेय शिक्षणाच्या बरोबरीने व्यवसाय शिक्षण देऊन जीवन जगण्यासाठी आवश्यक कौशल्यांचा विकास करणे.

१४) सहभावनेतून निर्माण होणारी वैयक्तिक गुणवत्ता व मानवी हक्कांबाबतची जागरूकता सामूहिक उपक्रमातून वाढीस लावणे.

## ५.४ प्राथमिक शिक्षणाची साधारण उद्दिष्टे

१) प्राथमिक स्तरावर मातृभाषा आणि अनिवार्य इंग्रजी/मराठी यांच्या अध्ययनातून श्रवण, भाषण–संभाषण, वाचन–लेखन ही मूलभूत भाषिक कौशल्ये विकसित करणे.

२) उच्च प्राथमिक स्तरावर मातृभाषेच्या मूलभूत भाषिक कौशल्यांचा अधिक विकास करणे. तसेच हिंदी आणि इंग्रजी भाषांमधील मूलभूत कौशल्यांचे दृढीकरण करणे.

३) वैज्ञानिक दृष्टिकोन व जिज्ञासू वृत्ती विकसित करणे.

४) निरीक्षण, तुलना, वर्गीकरण, प्रयोग करणे, निष्कर्ष काढणे व त्यांचे निवेदन करणे यांसारखी मूलभूत वैज्ञानिक कौशल्ये निर्माण/विकसित करणे. तसेच वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करणे.

५) विद्यार्थ्यांमध्ये माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानविषयक कौशल्ये निर्माण करणे.

६) भारतीय सांस्कृतिक परंपरा आणि भौगोलिक व सांस्कृतिक विविधता यांची ओळख करून देणे.

७) सामाजिक हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्याबरोबर सहकार्य आणि सहिष्णुता यांची जाणीव निर्माण करणे.

८) विद्यार्थ्यांमध्ये लिंगसमभाव वृत्तीची जोपासना व वंचित घटकांच्या आणि महिलांच्या सबलीकरणाच्या आवश्यकतेची जाणीव निर्माण करणे.

९) पर्यावरण संवर्धन आणि संरक्षण करण्याची वैयक्तिक व सामुदायिक जबाबदारी अंगी बाणण्यास मदत करणे.

१०) विद्यार्थ्यांच्या अंगभूत गुणांचा शोध घेऊन त्याचा परिपोष करणे.

११) विद्यार्थ्यांमध्ये विविध कलागुणांची जोपासना करणे.

१२) विद्यार्थ्यांच्या शरीरसंपदेचा विकास करणे तसेच आरोग्यविषयक योग्य सवयी लावणे.

१३) विद्यार्थ्यांमध्ये श्रमप्रतिष्ठेची जाणीव निर्माण करणे.

१४) विविध जीवनकौशल्ये विकसित करणे.

१५) प्रादेशिकता, अंधश्रद्धा, लोकसंख्यावाढ, प्रदूषण, भ्रष्टाचार इत्यादी समस्यांची जाणीव करून देणे आणि मानवतावादी जाणिवा विकसित करणे.

१६) सामाजिक हक्क, जबाबदाऱ्या, परस्पर सहकार्य, शांतता व सहिष्णुता यांची जाणीव निर्माण करणे.

१७) दैनंदिन जीवन व शेती यांच्या परस्पर संबंधांची जाणीव निर्माण करणे.

१८) वैयक्तिक आरोग्याबरोबरच सार्वजनिक आरोग्याची जाणीव निर्माण करणे.

## ६. अभ्यासक्रमातील काही महत्त्वाचे मुद्दे : भूमिका

### राष्ट्रीय व राज्य पातळीवरील आस्थेचे विषय (National & State Concerns)

६.१ **पर्यावरण शिक्षण :** राष्ट्रीय आणि राज्य स्तरावर पर्यावरण शिक्षणाचे महत्त्व वाढते आहे. लोकसंख्या वाढीच्या गरजा भागविण्यासाठी तंत्रज्ञानाचा आणि निरनिराळ्या ऊर्जासाधनांचा शोध आणि वाढता वापर अपरिहार्य आहे. परंतु त्यातून होणाऱ्या पर्यावरण हानीमुळे नजीकच्या भविष्यकाळात मानवजात अस्तित्वात राहील की नाही असा प्रश्न उभा राहिला आहे. त्यामुळे याविषयी जागरूकता, प्रत्येकाने आपल्या स्तरावर करायची उपाययोजना याचे भान अधिकाधिक प्रमाणात निर्माण होण्याची जबाबदारी प्रत्येक अभ्यासक्रमास स्वीकारावी लागणार आहे. पर्यावरण शिक्षण हा स्वतंत्र विषय न ठेवता पूर्वीप्रमाणेच निरनिराळे विषय आणि सहशालेय नावीन्यपूर्ण कृतियुक्त उपक्रम यांतून विद्यार्थ्यांपर्यंत एकात्मिक पद्धतीने पोहोचविणे अपेक्षित आहे. तसेच त्यांच्या माध्यमातून योग्य जागरूकता आणि कृतिशीलता विकसित करणे अपेक्षित आहे. 'पर्यावरणाचा समतोल राखून विकास' हे तत्त्व विविध उपक्रमांतून रुजविणे आवश्यक आहे.

६.२ **मूल्यशिक्षण :** परिसरात जे घडते त्याचे अनुकरण मुलांकडून होत असते. त्यामुळे चांगली मूल्ये रुजायची असतील तर किमान शाळेत व घरात ती मूल्ये पाळली जात आहेत हे निरनिराळ्या प्रसंगांतून विद्यार्थ्याला जाणवायला हवे. बोधप्रद कथा, गीते यापुरते मूल्यशिक्षण मर्यादित राहता कामा नये. याविषयी शिक्षक–पालक यांनी सामाईक कार्यक्रम आखणे उपयुक्त होईल.

मूल्यशिक्षण हा स्वतंत्रपणे शिकवायचा भाग नाही. निरनिराळे विषय शिकविताना योग्य ठिकाणी त्यांची गुंफण आणि रुजवण पूर्वीप्रमाणेच अपेक्षित आहे. एखाद्या उपक्रमातून अनेक मूल्ये साध्य होऊ शकतात हे लक्षात घेतल्यास अनेक मूल्ये रुजविण्याचा बोजा वाटणार नाही.

६.३ **स्त्री–पुरुष समानता :** स्त्री–पुरुष समानता हे मूल्य निरनिराळ्या विषयांतून रुजवण्याबरोबर त्याविषयी स्थानिक परिस्थितीनुसार नियोजन उपयोगी ठरणार आहे. अशी असमानता शाळेत व घरी कोठे कोठे आढळते हे शोधण्यासाठी व एकत्र चर्चेतून ती दूर करण्यासाठी व्यावहारिक कार्यक्रम निश्चित केल्यास अधिक चांगला परिणाम दिसू शकेल. स्त्रियांमध्ये पुरुषांप्रमाणे सर्व क्षमता आहेत हे ठसविताना केवळ लोकोत्तर महिलांची उदाहरणे न निवडता अलीकडच्या काळातील, आसपासच्या परिसरातील उदाहरणे निवडल्यास मुलांना ती अधिक भावतील व शक्यतेच्या पातळीवरची वाटतील.

६.४ **शांततेसाठी शिक्षण :** एकविसावे शतक तंत्रज्ञानातील विस्मयजनक आविष्कार आणि निरनिराळ्या क्षेत्रातील समृद्धीबरोबर अशांती आणि ताणतणावही बरोबर घेऊन आले आहे. ते कमी करण्यासाठी मनात ताण कशामुळे निर्माण होतो याविषयी आत्मनिरीक्षण करण्यास प्रोत्साहन द्यायला हवे. तसेच विश्वशांतीविषयी उद्बोधन करताना कुटुंब आणि मित्रपरिवारात शांतिपूर्ण संबंध राखणे कसे महत्त्वाचे आहे आणि त्यातूनच जागतिक पातळीवरील शांततेचा मार्ग सापडण्याची शक्यता आहे हे ठसविले

पाहिजे. व्यक्तिगत, कौटुंबिक व मित्रपरिवारातील तसेच समाजातील ताणतणाव व त्यामागील कारणे यावर चर्चा घडवून आणावी. ते दूर करण्यासाठी उपक्रमांचे नियोजन करावे.

६.५ **मानवी हक्कांची जपणूक :** भारतीय राज्य घटनेमध्ये जीवन, स्वातंत्र्य, समता, प्रतिष्ठा (dignity) या विषयी हक्कांचा समावेश आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय स्तरावरील काही हक्क मानवी हक्क कायद्यात समाविष्ट आहेत. या हक्कांचा परिचय अभ्यासक्रमात व्हावा तसेच त्यांच्या अंमलबजावणीविषयी निरनिराळ्या विषयांच्या माध्यमातून उद्‌बोधन व्हावे अशी अपेक्षा आहे.

६.६ **श्रमसंस्कार :** शारीरिक व बौद्धिक श्रमातून माणसाने अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजा पूर्ण करण्याचे प्रगत व कल्पक मार्ग शोधले आहेत. त्या पलिकडे जाऊन विविध रसायने, भव्य–सुंदर वास्तू, संगणक, अवकाशयान इ. थक्क करणारी यंत्रसामग्री अशी स्वंतत्र मानवनिर्मित सृष्टी तयार केली आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमातून श्रमसंस्काराचा समावेश मूलभूत व अपिरहार्य आहे. हे संस्कार करताना काही महत्त्वाची तत्त्वे विद्यार्थ्यांच्या मानवार बिंबवणे अपेक्षित आहे. पहिले तत्त्व म्हणजे शारीरिक श्रमाबद्दल आदर बाळगणे. यामध्ये दुसऱ्या व्यक्तीने केलेल्या श्रमांची दखल, प्रशंसा एवढेच अपेक्षित नसून निरनिराळ्या प्रसंगी आवश्यक श्रमात स्वत: सहजपणे सहभागी होणे अपेक्षित आहे. कलाशिक्षण, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण याखेरीज इतर सर्वच शालेय विषयांतून व सहशालेय उपक्रमांतून श्रमसंस्कार एकात्मिक रीतीने व्हावा असे नियोजन पाठ्यपुस्तके व अध्ययन–अध्यापन प्रक्रिया यांमध्ये अपेक्षित आहेत.

## ७. अभ्यासक्रमाची अंमलबजावणी :

७.१ **अध्ययन–अध्यापन प्रक्रिया :** या अभ्यासक्रमासाठी पायाभूत विचारसरणी म्हणून ज्ञानसंरचनावादाचा आपण स्वीकार केलेला आहे. साहजिकच यापुढे वर्गातील शिक्षक–विद्यार्थी आंतरक्रियेमध्ये अध्यापनापेक्षा अध्ययनाला महत्त्वाचे स्थान राहणार आहे. विद्यार्थ्यांना स्वयंशिक्षणासाठी प्रवृत्त करणे, त्यांना ज्ञाननिर्मितीसाठी विविध स्रोत उपलब्ध करून देणे, ज्ञाननिर्मितीमध्ये विद्यार्थ्यांना अडचण अथवा अडथळा निर्माण झाला तर त्याचे स्वरूप समजावून घेऊन योग्य तो स्रोत सुचविणे अथवा त्यांच्या विचारात दिसणारी त्रुटी, त्यांचा उत्साह कमी होणार नाही अशा रीतीने लक्षात आणून देणे, सूचक प्रश्न विचारून चिकित्सक विचारप्रक्रिया सुरू करून देणे हे शिक्षकांचे मुख्य काम आहे.

यासाठी त्यांना जुनी भूमिका विसरून नवी भूमिका स्वीकारावी लागणार आहे. हे सुरुवातीला कठीण वाटेल; पण २१ व्या शतकातील नागरिक म्हणून आपल्या विद्यार्थ्यांना तयार करायचे आहे. या नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागणार आहे. समस्यांचे स्वरूप समजावून घेणे, त्यांतील कळीचा मुद्दा शोधणे यात लागणारी कौशल्ये आत्मसात करण्याची पूर्वतयारी लहान वयात झाली तरच पुढे निभाव लागतो. ही तयारी करून घ्यायची तर आपल्यालाही जुन्या सवयी सोडाव्या लागतील आणि नवीन सवयी अंगी बाणवून घ्याव्या लागतील.

आपल्या जुन्या सवयीप्रमाणे विद्यार्थ्यांना तयार उत्तरे पुरविण्याकडे आपला कल होता. आता ह्यात बदल करावा लागणार आहे. विद्यार्थ्यांनी आपल्या समस्येचे उत्तर स्वत: किंवा सहाध्यायींबरोबर मिळून प्रयत्न करून शोधून काढावयाचे आहे. ती क्षमता त्यांच्याकडे असते. आपण ती क्षमता जोपासावयाची आहे. त्यासाठी यापुढे आपली भूमिका सुलभकाची (Facilitator) राहणार आहे. ती पार पाडण्यासाठी आपल्याला पुढील सवयी लावून घ्याव्या लागणार आहेत–

१. विद्यार्थ्यांना ज्ञाननिर्मितीची प्रेरणा देऊन अनुभवाचे नियोजन करणे, त्यांची जिज्ञासा जागृत करणे, हा यासाठीचा सर्वोत्तम मार्ग आहे. त्यांच्यापुढे एखादी समस्या मांडून अथवा प्रश्न उपस्थित करून हे साधता येईल किंवा एखाद्या घटकाचे व्यापक स्वरूप सादर करून त्यातील उपघटकांच्या विविधांगांनी माहिती गोळा करायला सुचविता येईल.

२. जिज्ञासा निर्माण झाल्यावर त्यांचे शोधकार्य सुरू व्हावे म्हणून प्रयोगशाळा अथवा ग्रंथालयातील साधने आणि साहित्य उपलब्ध करून देणे किंवा कार्यक्षेत्रात नेऊन कर्मचाऱ्यांच्या कार्याचे निरीक्षण करण्याची, त्यांच्याशी चर्चा करण्याची संधी उपलब्ध करून देणे किंवा निसर्गात वृक्ष, वेली, पशू, पक्षी यांचे निरीक्षण करण्याची संधी देणे.

३. जिज्ञासेपोटी गोळा केलेल्या माहितीचे तपशील नोंदविणे, तर्काच्या आधारे विश्लेषण करणे, परस्परसंबंध शोधणे, त्यावर चिंतन करणे, निष्कर्ष काढणे, आपले निष्कर्ष गटासमोर मांडणे, त्यावर चर्चा करणे, इत्यादींसाठी विद्यार्थ्यांना वेळ आणि जागा उपलब्ध करून देणे.

४. त्यांच्या चर्चेवर लक्ष ठेवून तर्कशुद्ध मांडणीचे, योग्य कामाचे कौतुक आणि आवश्यक तेथे आणि आवश्यक तेवढेच मार्गदर्शन करणे.

७.२ **अध्ययन साहित्य :** वर वर्णन केल्याप्रमाणे वर्गात आणि वर्गाबाहेरही अध्ययनप्रक्रियेलाच महत्त्व येणार असल्यामुळे यापुढे अध्ययनसाहित्याचे महत्त्व अनन्यसाधारण मानले जाणार आहे. जिज्ञासा पूर्ण करण्यासाठी विद्यार्थ्यांना पुस्तके, ग्रंथ, संदर्भग्रंथ यांचा तर उपयोग करावा लागणारच आहे. पण त्याचबरोबर आकाशवाणी, दूरचित्रवाणी, संगणक–आंतरजाल यांच्या साहाय्याने जगभरातील ज्ञानाचे खजिनेही शाळेत उपलब्ध होणार आहेत. गरज पडणार आहे ती या साऱ्यातून आवश्यक ते संदर्भ कसे शोधायचे, त्यातून मिळणाऱ्या माहितीतील आपल्या कामाशी संबंधित तपशील कसा शोधायचा, कसा पद्धतशीर नोंदवायचा आणि आपल्या कामात त्याचा नेमका कुठे आणि कसा उपयोग करावयाचा या संबंधी निर्णय घेण्याची. पण हेही लक्षात घ्यावे लागणार आहे की हे सारे माहितीचे दुय्यम स्रोत आहेत. त्यांच्यापेक्षाही अधिक उपयुक्त आहेत ते माहितीचे प्रत्यक्ष स्रोत. ते असणार आहेत जीवनाच्या विविध क्षेत्रांत आणि निसर्गात. तिथे जाण्यापूर्वी कोणत्या हेतूने ही माहिती मिळवावयाची, ती नेमकी कोठे सापडेल, ती कशी गोळा करायची, कशी साठवायची याचे नियोजन करावे लागेल. अर्थात विविध क्षेत्रात आणि निसर्गाच्या सान्निध्यात जात असल्याने नियोजनात न आलेल्या अनेक जिवंत स्रोतांची अचानक गाठ पडणार आहे. त्याचा समयसूचकतने कसा उपयोग करायचा हेही माहिती असायला हवे. नसेल तर त्यासंबंधीचे मार्गदर्शन घ्यावे लागेल.

विद्यार्थ्यांना या विविध स्रोतांतून मिळणाऱ्या माहितीचे त्यांच्या पूर्वानुभवांच्या साहाय्याने आकलन करून द्यावयाचे आहे. मेंदूत अगोदरच तयार झालेल्या ज्ञानरचनांशी (Structures of Schemes of Knowledge) त्यांचे नाते जुळले तर काम सोपे होणार आहे पण त्या रचनांशी विरोधी माहिती समोर आली तर मात्र ती सोडून द्यायची का आपली मूळ ज्ञानरचनाच बदलायची याचा निर्णय घ्यावा लागणार आहे. तर्क, सारासार बुद्धी पुरेशी पडली नाही तर मित्रांशी, कार्यक्षेत्रातील साधनव्यक्तींशी अथवा शिक्षक–शिक्षिका यांच्याशी नि:संकोचपणे चर्चा करावी लागणार आहे.

हे सारे अनुभवातून साकारणार आहे. पण त्यासाठी शिक्षकांच्या वर्तनाचे निरीक्षण करून, त्यांना शंका विचारून विद्यार्थ्यांना सुरुवात करावी लागणार आहे आणि शेवटी निर्णय स्वत: घ्यावे लागणार आहेत.

७.३ **मूल्यमापन :** बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम (२००९), लागू झाल्यानंतर त्यातील कलम २९(२) च्या अंमलबजावणीचा भाग म्हणून २० ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयाद्वारे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन योजना लागू करण्यात आली व सर्वांनी ती विधायकपणे स्वीकारली आहे. हा शासननिर्णय परिशिष्ट क्र. ३ येथे जोडला आहे. हीच योजना पुनर्रचित अभ्यासक्रमाची अंमलबजावणी करताना सुरू ठेवायची आहे. तसेच या शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्याविषयक प्राधिकरणाने पाठविलेल्या परिपत्रकानुसार योग्य ती कार्यवाही करावयाची आहे. या योजनेनुसार शिक्षकांनी आकारिक व संकलित मूल्यमापनासाठी जी साधनतंत्रे वापरायची आहेत त्यांचा समावेश निरनिराळ्या विषयांतील पाठ्यक्रमात नमुन्यादाखल केला आहे.

७.४ **माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून अभ्यासक्रमाची प्रभावी अंमलबजावणी :**

अभ्यासक्रमातील अपेक्षा वर्गामध्ये मूर्त होण्यासाठी दर्जेदार पाठ्यसाहित्यसंच, प्रभावी शिक्षक–प्रशिक्षण, शिक्षकांची विद्यार्थ्यांना उत्स्फूर्तपणे अध्ययनाला प्रवृत्त करणारी अध्ययन–अध्यापन पद्धती व विकासात्मक, प्रेरक मूल्यमापन योजना या सर्वच घटकांची उत्तम साथ आवश्यक आहे. या सर्व प्रक्रियांची परिणामकारकता वाढवून त्यात अर्थपूर्ण विविधता आणण्यासाठी माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा दैनंदिन वापर करणे ही काळाची गरज ठरली आहे. त्यासाठी आवश्यक संगणक, आंतरजाल (internet) इत्यादी यंत्रणा आज मर्यादित शाळांत उपलब्ध असली तरी यथावकाश सर्व शाळांत उपलब्ध होणार आहे.

शिक्षकांना वर्गाबाहेरील, गुंतागुंतीचे तसेच चलत् स्वरूपाचे, एरवी आयोजनासाठी अवघड असे अध्ययन अनुभव हे तंत्रज्ञान वापरून सहजपणे देणे शक्य होणार आहे. त्यासाठी आंतरजालावरील लाखोंपैकी योग्य वेबसाईटची निवड करता यायला हवी. याचबरोबर शिक्षकांनीही संगणकाचा वापर करून शिकवण्यासाठी नेमके साहित्य संकलित करण्याचे कौशल्य यथावकाश आत्मसात करणे अपेक्षित आहे. विद्यार्थ्यांशी कृतियुक्त संवाद साधणारे (interactive) सॉफ्टवेअर पायरी–पायरीने अध्ययन नियोजनासाठी तसेच कल्पक व विविधता असणारा सराव देण्यासाठी तयार करावे लागेल

किंवा गुंतागुंतीच्या आशयाविषयीचे सॉफ्टवेअर तयार करून घ्यावे लागेल. शैक्षणिक वेबसाईटद्वारा यातील निवडक यशस्वी अध्ययन/अनुभवांच्या संग्रहाचे आदान प्रदान शिक्षकांना आपसात करणे शक्य होणार आहे.

या तंत्रज्ञानाच्या आधारे मूल्यमापनालाही नवे परिमाण देणे अपेक्षित आहे. उत्तम प्रश्नांचा संग्रह करून त्यातून हव्या त्या संख्येने समांतर प्रश्नपत्रिका तयार करणे, मूल्यमापनात चित्रे, आकृत्या, कोडी इत्यादींचा भरपूर वापर, श्रवणासंबंधित अनुभवांचा समावेश, ऑनलाईन मूल्यमापन अशा अनेक शक्यता टप्प्याटप्प्याने मूर्त स्वरूपात आणणे अपेक्षित आहे.

विशेष गरजा असणारी मुले ज्या प्रकारच्या अनुभवांवर अधिक अवलंबून असतात त्यांना ते अनुभव तंत्रज्ञानाद्वारे विपुल प्रमाणात व समर्थपणे देता येतील. उदाहरणार्थ ऐकू न येणाऱ्या मुलांना डोळ्यांनी घेता येणारे किंवा दृष्टीची समस्या असल्यास श्रवण स्वरूपातील अनुभवांचे नियोजन करता येईल. त्याविषयी आवर्जून नियोजन करावे.

## ८ विषयनिहाय आठवडयातील कालावधीची टक्केवारी व तासिका

**विषयनिहाय आठवड्यातील कालावधीची टक्केवारी व तासिका**

| इयत्ता | विषय | कालावधी टक्केवारी | तासिका |
|---|---|---|---|
| **पहिली व दुसरी** | १) प्रथम भाषा | ३६ | १८ |
| | २) इंग्रजी | १२ | ६ |
| | ३) गणित | २४ | १२ |
| | ४) कार्यानुभव | १० | ५ |
| | ५) कला शिक्षण | ८ | ४ |
| | ६) शारीरिक शिक्षण | १० | ५ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |
| **तिसरी व चौथी** | १) प्रथम भाषा | २६ | १३ |
| | २) इंग्रजी | १२ | ६ |
| | ३) गणित | १६ | ८ |
| | ४) परिसर अभ्यास भाग-१ व परिसर अभ्यास भाग-२ | १८ | ९ |
| | ५) कार्यानुभव | १० | ५ |
| | ६) कला शिक्षण | ८ | ४ |
| | ७) शारीरिक शिक्षण | १० | ५ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

| इयत्ता | विषय | कालावधी टक्केवारी | तासिका |
|---|---|---|---|
| **पाचवी** | १) प्रथम भाषा | १४ | ७ |
| | २) द्वितीय भाषा | ८ | ४ |
| | ३) तृतीय भाषा | १४ | ७ |
| | ४) गणित | १४ | ७ |
| | ५) परिसर अभ्यास भाग-१ व परिसर अभ्यास भाग २ | २६ | १३ |
| | ६) कार्यानुभव | ८ | ४ |
| | ७) कला शिक्षण | ८ | ४ |
| | ८) शारीरिक शिक्षण | ८ | ४ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |
| **सहावी, सातवी व आठवी** | १) प्रथम भाषा | १४ | ७ |
| | २) द्वितीय भाषा | ८ | ४ |
| | ३) तृतीय भाषा | १४ | ७ |
| | ४) गणित | १४ | ७ |
| | ५) सामान्य विज्ञान | १२ | ६ |
| | ६) सामाजिक शास्त्रे | १४ | ७ |
| | ७) कार्यानुभव | ८ | ४ |
| | ८) कला शिक्षण | ८ | ४ |
| | ९) शारीरिक शिक्षण | ८ | ४ |
| | **एकूण** | **१००** | **५०** |

- शासनाने दि. २९ एप्रिल २०११ च्या शासननिर्णयानुसार शैक्षणिक वर्षामधील कामाचे किमान दिवस, शिक्षणाचे तास व शिक्षकांसाठी प्रत्येक आठवड्याला किमान तास विहीत केले आहेत. परिशिष्ट क्र. ४ येथे हा शासननिर्णय जोडला आहे.

- इयत्ता पहिली ते आठवीचा एका आठवड्यातील अध्ययन कालावधी ५० तासिका एवढा आहे. स्थानिक परिस्थितीनुसार अपरिहार्य झाल्यास तासिका विभागणीत थोडी लवचीकता ठेवण्यास हरकत नाही.